अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

वर्ष : २४ वे ▸ अंक : १२७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ ।

# पंढरीतील वस्त्रहरण



## चंद्रभागेला राजकीय विटाळाचे प्रदूषण!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

दक्षिण काशी पंढरपूर ही विठुरायाची नगरी. राज्याची अध्यात्मिक राजधानी. इथं कीर्तन, भजन, प्रवचन, भारुड, हरिपाठ यातून सदासर्वकाळ विठुरायाचा...हरिनामाचा गजर होत असतो. मात्र याच विठुरायाच्या पावन नगरीसह परिसरात राजकीय पटलावर या तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, नेतेमंडळींकडून वैयक्तिक पातळीवर टिकेचा राजकीय ‘गजर’ सुरु आहे. प्रचारातील विकासाचे मुद्दे केव्हाच चंद्रभागातील पाण्यावरील फेसाप्रमाणं विरुन गेलेत. खिल्ली उडवणं चालू आहे. कोण कोणाची लाज काढतंय... कोणी कोणाच्या आईचं दूध प्यालेलं काढतंय... हत्तीनं सोंड फिरवली तर काय अवस्था होईल, असं म्हणतंय...सांगा मी कोणाची म्हणतंय?...कोणी कोणाला विचारतंय तुमचं छत तरी केवढं? तप्त उन्हानं चंद्रभागेचं वाळवंट जसं तापतं तसं खालच्या पातळीवरील टिकेमुळं इथं निवडणुकीच्या आखाड्यात जणू ज्वालामुखीच्या ठिणग्या पडताहेत. नेतेमंडळींकडून एकमेकांचं वस्त्रहरणं होतंय. अत्यंत अनपेक्षित अशा वळणावर इथलं राजकारण किंबहुना जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक गेली आहे. श्री विठ्ठल आणि श्री पांडुरंग या दोन परिवारांमध्ये पारंपारिकरित्या होणारा निवडणुकीचा बाज या खेपेस दिसत नाही. खरं तर परिचारक विरुद्ध भालके या गटांमध्येच निवडणूक होणं अपेक्षित होतं. मात्र या खेपेच्या निवडणुकीला वेगळे धुमारे फुटलेत. विठ्ठल परिवाराच्या झेंड्याखाली असलेल्या नेतेमंडळींनीच एकमेकांच्या विरुद्ध बाह्या सरसावल्या आहेत. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार अभिजित पाटील यांच्यामध्ये चांगली जुंपली आहे.



### धैर्यशीलभैय्यांनी वात पेटवली

### अन् तिथूनच उडाला टिकेचा भडका

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचा प्रचार शुभारंभ पंढरपूर तालुक्यात झाला. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यातील जनता ही स्वाभिमानी आहे, ती पाणी दाखविल्याशिवाय राहणार नाही. नगरपालिकेचा सुफडासाफ पॅटर्न जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत दिसेल असं वक्तव्य करत त्यांनी या सभेतून टिकेची वात पेटवली खरी पण तिथूनच पुढं टिकेचा भडका या तालुक्यात उडतोय.

### पंढरपूर तालुक्यातील निवडणुकीच्या थेट आखाड्यातून...

- वाखरी गटाच्या पोस्टरवरुन दिलीप धोत्रे, अनिल सावंत आदींचे फोटो गायब केल्यानं पेटलं पुन्हा राजकारण
- निवडणुकीच्या प्रचारातून विकासाचा मुद्दा गायब, टिकेला ऊत
- पालकमंत्री गोरेंनी तालुक्यातील निवडणूक घेतली हातात, जि.प.चे ८, पं.स.चे १६ उमेदवारांच्या विजयासाठी लावली ताकद
- नेतेमंडळींकडून होत असलेल्या वैयक्तिक टिकांमुळे तापला आखाडा
- विधानसभा निवडणुकीत केलेल्या कुरघोड्यांचं आता जाहीर सभांमधून होतेय पोस्टमार्टम
- विठ्ठल परिवाराचे नेते फुटले, सगळ्यांची तोंडं वेगवेगळ्या दिशेला
- विठ्ठल परिवारामधील तमाशा बघण्याची पाडुंरंग परिवाराला आयती संधी
- नेतेमंडळींकडून होत असलेल्या वस्त्रहरणामधून नागरिकांचे होतंय मनोरंजन

### पूर्वाश्रमीचे जिगर दोस्त

### निवडणुकीच्या आखाड्यात मात्र भिडले!

विठ्ठल परिवारातील मतभेदांमुळे निवडणुकीच्या सुरूवातीपासूनच जोरदार टीका येथे होत असून याच परिवारातील नेते एकमेकांना टार्गेट करत असल्याने चित्र आहे. काळे व आमदार पाटील यांच्यात सुरूवातीपासूनच कलगीतुरा रंगला आहे. आता पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आमदार पाटील यांच्यावर जोरदार टीका करण्यास सुरूवात केली आहे. यापूर्वी गोरे व पाटील यांची मैत्री सर्वश्रुत होती. मात्र राजकारण बदलतं असतं हेच खरे म्हणण्याची वेळ आली आहे. दोघे जिगर दोस्त निवडणुकीच्या आखाड्यात मात्र भिडले आहेत.

### भालकेंनी काढलं आईचं दूध पिणं; टिकेतून उपस्थितांचं झालं का समाधान?

पंढरपूर नगराध्यक्षपदावर डॉ.प्रणिता भालके निवडून आल्यानंतर त्यांच्या दहा वर्षाच्या मुलाने विजयी मिरवणुकीदरम्यान दंड थोपटले होते. यावर आमदार समाधान आवताडे यांनी टिका केली होती. त्या टिकेला उत्तर देताना भगिरथ भालकेंनी त्यांचा खरपूस समाचार घेतला. पोटनिवडणुकीत निवडून आल्यानंतर तुम्ही दंड थोपटले होते, तेव्हा कुठल्या आईचे दूध प्याला होता, असा सवाल उपस्थित करत भालकेंनी आमदार समाधान आवताडे यांच्यावर हल्लबोल केला. याय हल्लाबोलानं भालके समर्थकांचं किती समाधान’ झालं याची चर्चादेखील रंगली.

### ऐनवेळेच्या युतीनं येणार का अजिर्ण, कट्टर शत्रुत्व निवडणुकीत मात्र एकत्र!

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपून गेल्यानंतर व प्रचाराला सुरूवात झाल्यावर आमदार अभिजित पाटील व तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नेते भगीरथ भालके यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. मुळात एकमेकांच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या या नेत्यांची ऐनवेळची आघाडी जनतेच्या कितपत पचनी पडणार? हे निकालानंतरच कळणार आहे. पाटील आणि भालकेंमध्ये तसं कट्टर शत्रुत्व मात्र हे दोघे भाजपला टक्कर देण्यासाठी एकत्र आलेत. जनता त्यांना किती स्विकारणार याचा फैसला येत्या शनिवारी ७ तारखेला होत आहे.

### आमदार पाटील-भालकेंचा पोरखेळ; अध्यक्ष वसंतनाना यांचं वेगळंच तुणतुण...

आमदार अभिजित पाटील आणि भगीरथ भालके यांनी आघाडी केली आहे. मात्र त्यांच्या आघाडीशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा आणि माझा कोणताही संबंध नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने कासेगाव जिल्हा परिषद गट व गणामध्ये उमेदवार उभे केले आहेत, आम्ही पक्षाच्या चिन्हावर ताकतीने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही कोणाला ही पाठिंबा देणार नाही, अशा राजकारणामुळे पंढरपूर तालुक्याचे वाटोळे झाले आहे, सध्या पंढरपूर तालुक्याच्या राजकारणामध्ये पोरखेळ सुरू आहे.अशी टिका करीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख यांनी वेगळंच टिकेचं तुणतुण वाजवणं सुरु ठेवलं आहे.

### मनसेच्या रेल्वे इंजिनमधून ‘लाजे’च्या धुराची काजळी

वाखरी जिल्हा परिषदेच्या गटात आयोजित प्रचार सभेत मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी कल्याणराव काळे यांच्यावर टिकेची सुसाट एक्स्प्रेस सोडली. यावेळी मनसेच्या रेल्वे इंजिनमधून लाजे’च्या धुराची काजळी पडली. विठ्ठल परिवार आणि कल्याणराव काळे यांचं समीकरण मांडताना धोत्रे यांनी अनेक सवाल उपस्थित करत पंचनामा केला. त्यातून निवडणुकीची हवा अजून तापली. सत्ता संघर्षाच्या लढाईची धार आणखीच वाढली.

### सांगा मी नक्की कोणाची?

पालक मंत्रि गोरेंनी आमदार अभिजित पाटलांवर टिकेची तोफगोळे फोडत मर्मावर बोट ठेवलं. आमदार पाटील यांचे नाव न घेता गडी लँडच होत नाही असं सांगताना त्यांनी पाटील यांचा फॉर्म्युला सांगितला. सकाळी बोराटवाडीत दुपारी अकलूजला, संध्याकाळी देवगिरीला, मध्यरात्री वर्षावर अशी त्यांची सवय असल्याचे सांगत ते स्थिर नसल्याचं नमुद केलं. सगळीकडं म्हणताहेत मी तुमचीच ...सांगा मी नक्की कोणाची? या शब्दात मंत्री गोरेंनी टीका केली.


### निवडणुका आल्या की मतदार संघात दिसतात... पालकमंत्री गोरेंनी भगिरथ भालकेंना लक्ष्य केलं अन...

अभिजित पाटील आणि भगिरथ भालके यांच्यावर टिकेची सुसाट एक्स्प्रेस सोडणाऱ्या पालकमंत्री जयकुमार गोरेंनी भालकेंना फैलावर घेत त्यांच्या कर्तृत्वाचा पंचानामा केला. आठ वर्षात एकही काम नसलेले भालके हे फक्त निवडणुकीत दिसतात...इतरवेळी गायब असतात हे सांगताना त्यांनी पंढरपूर नगरपालिकेचं उदाहरण भालकेंबाबत देत त्यांना महत्त्व देऊ नका असं सांगून त्यांचा सातबारा जाहीर सभेतून मांडला.

### हत्तीच्या सोंडेचे उदाहरण आणि उफाळला वाद

निवडणुकीच्या निमित्तानं, कासेगाव इथं झालेल्या जाहीर सभेत पालकमंत्री जयकुमार गोरेंनी अकलूजकर मोहिते-पाटील आणि आमदार अभिजित पाटील यांच्यावर खरमरीत टिका करताना त्यांना चांगलंच घेरलं. हत्तीच्या सोंडेंचं उदाहरण देऊन सुचक इशारा दिला. कारखान्याच्या ‘कळी’च्या मुद्यालाच त्यांनी हात घालत जो काही निरोप द्यायचा होता, तो मोहिते-पाटील आणि अभिजित पाटलांना दिला. या गर्भित इशाऱ्यानं स्प्रींगप्रमाणं आमदार अभिजित पाटील पुन्हा उसळले. निवडणुकीच्या प्रचाराच्या धामधुमीत टिकेतून वाद उफाळला.‘

### अभिजितआबांचा ‘जोर का झटका’



रिलस्टार, चांगला अभिनय करणारा या विरोधकांनी केलेल्या टिप्पणीवर अभिजित पाटलांनी जोर का झटका याप्रमाणे मार्मिक शब्दात सडेतोड उत्तर दिलं. अंगात चांगले गुण असायलाच हवेत, कोणाच्या अंगात कसे गुण आहेत, हे सर्वांनी पाहिलं, असा टोला आमदार पाटील यांनी पालकमंत्र्यांना नाव न घेता लगावला. विमानातून प्रवास करण्याच्या मुद्यावर पाटील म्हणाले की, जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी फिरतो, कोणाच्या डोक्यात कोणती ‘हवा’ आहे, हे ओळखावं. महापुराच्या संकटात आणलेलं हेलिकॉप्टर हे काय कोणाच्या घरचं नव्हतं. ते सरकारचं होतं. कोणी आणलं? यापेक्षा लोकांचे जीव वाचले हे महत्त्वाचं.तुमचं छत तरी किती आहे हे दाखवा असे आव्हानच पाटील यांनी दिलं.

# पाच वर्षांचा कारभार! सव्वा वर्षांचा कारभारी!

## भाजपाचा नवा फॉर्म्युला, राज्यभरात अंमल होणार?

✔ सोलापूर/प्रतिनिधी

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये भाजपने लक्षणीय यश संपादन करत २९ पैकी तब्बल २६ महापालिकांमध्ये सत्ता काबीज केली आहे. या विजयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे वर्चस्व अधिक बळकट झाले आहे. आता सत्तेच्या वाटपात अधिकाधिक कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी पक्षाने महापौर आणि उपमहापौर पदासाठी सव्वा वर्षांचा नवा पॅटर्न लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. त्यामुळे सोलापुरात काय निर्णय होणार याकडेही आता सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.




महापालिकांचा कार्यकाळ साधारणपणे पाच वर्षांचा असतो. त्यात दोनदा आरक्षण काढून अडीच- अडीच वर्षांचे दोन टप्पे करण्यात आला आहे. त्यानुसार महापालिकेत महापौर आणि उपमहापौर पदाचा कार्यकाळ नियमानुसार अडीच वर्षांचा आहे. परंतु आरक्षण पडल्यानंतर सर्वच महापालिकेत महापौर आणि उपमहापौर पदासाठी अनेकजण इच्छुक झाले आहेत. त्यामुळे पक्षश्रेष्ठींपुढे अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे प्रदेश भाजपाने हा कालावधी विभागून वेगवेगळ्या कार्यकर्त्यांना संधी देण्याची नवी रणनीती आखली आहे.

या पद्धतींनुसार भाजपाने सव्वा-सव्वा वर्षाचा नवा पॅटर्न राबवण्यास सुरूवात केली आहे. सव्वा वर्षांनंतर महापौर आणि उमहापौर पदांमध्ये बदल करून नेतृत्वाचे विकेंद्रीकरण केले जाणार आहे. त्यामुळे एकाच गटाचा किंवा व्यक्तींचा वर्चस्व राहणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे. भाजपने ज्या महापालिकांमध्ये हा पॅटर्न यशस्वी ठरेल, तिथल्या अनुभवाच्या आधारे इतर शहरांमध्येही तो लागू करण्याचा विचार सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे उर्वरित महापालिकांमध्येही लवकरच अशाच प्रकारचा बदल दिसून येऊ शकतो, असे बोलले जात आहे.

### कोणत्या शहरांमध्ये अंमलबजावणी?

सध्या कोल्हापूर, अमरावती, अहिल्यानगर, ठाणे, नागपूर येथे सव्वा वर्षाचे महापौरपद केले आहे. तर इचलकरंजी, सांगली या महापालिकांमध्ये दहा महिन्यांसाठी महापौरपद देण्यासंदर्भात चर्चा सुरू आहेत. या ठिकाणी पदांचा कालावधी विभागून अनेक नगरसेवकांना महापौर-उपमहापौर पदाची संधी दिली जात आहे. आणखी काही ठिकाणी हाच पॅटर्न लागू करण्याचा विचार प्रदेश भाजप करता आहे.

### पक्षाची रणनीती काय?

पक्षातील नाराजी कमी करणे, गटबाजी आटोक्यात ठेवणे, नवीन नेतृत्व तयार करणे, आगामी निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढवणे, या सर्व बाबी लक्षात घेऊन भाजपने हा प्रयोग सुरू केल्याचे दिसून येते. सत्तेत असताना अधिकाधिक कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामाची संधीफ देणे ही पक्षाची दीर्घकालीन रणनीती असल्याचे सांगितले जाते.

### निष्कर्ष

एकूणच, महापालिका निवडणुकांतील मोठ्या विजयानंतर भाजपने सव्वा वर्षांचाफ पॅटर्न लागू करत नेतृत्वात व्यापक सहभागाची दिशा स्वीकारली आहे. हा प्रयोग संघटनात्मकदृष्ट्या फायदेशीर ठरेल की प्रशासनिक अडचणी निर्माण करेल, हे येत्या काळात स्पष्ट होईल. मात्र सध्या तरी राज्यातील स्थानिक राजकारणात या नव्या पद्धतीची जोरदार चर्चा रंगली आहे.

### सोलापूरचा निर्णय पालकमंत्र्यांकडेच

भाजपने सध्या तरी ७ ते ८ महापालिकामध्ये सव्वा वर्षाचा महापौर हा पॅटर्न सुरू केला आहे. सोलापुरात अद्याप हा निर्णय झालेला नाही. मात्र महापौरपदाच्या शर्यतील जे होते त्यांनी पालकमंत्र्यांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसकडे हा प्रस्ताव ठेवला आहे. मात्र त्यावर कोणताही निर्णय झालेला नाही. प्राप्त माहितीनुसार याचा सर्वाधिकार पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सचिन कल्याणशेट्टी आणि आ. देवेंद्र कोठे यांच्याकडेच असणार आहे.





### जि.प.मध्येही हाच पॅटर्न?

सध्या राज्यात १२ ठिकाणी जिल्हा परिषदेच्या निवडणुका होत आहे. येथेही जि.प.चे अध्यक्षपद अडीच वर्षासाठी आरक्षित आहे. ज्या ठिकाणी भाजपचा जि.प. अध्यक्ष बसेल तेथेही भाजप महापालिका प्रमाणे सव्वा-सव्वा वर्षाचा पॅटर्न राबवणार का याचीही उत्सुकता लागली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



ते कधीही मागे फिरू शकतात !

कल्याण
188-78-378

मुंबई
147-21-579